भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५१५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १७/०७/२०१७

**१) हिंदु लोकांच्या धार्मीक भावना दुखावल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १५/०७/२०१७ चे १९.३० वा. दर. यातील फिर्यादी हरीचंद्र झगडु बंधाटे वय ४० वर्ष, रा. तिलक वार्ड मोहाडी याने आपले मोबाईल व्हॉस्टस्अप वर देश की शान लोधी गृप ओपन केला असता व्हीडीओ मध्ये ०२ ईसम दिसत असुन हिंदु धर्मियांना अश्लिल शिव्या देतांनी दिसत असल्याने हिंदु लोकांच्या धार्मिक भावना दुखावल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम २९५(अ) भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. तेलुरे पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) टँकर चालकांने आपले वाहन निष्काळजीपणामुळे चालवुन बैलबंडीला धडक दिल्याने एक जखमी व एकाचे मरणास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १६/०७/२०१७ चे १४.५६ वा. दर. यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील टँकर भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन बैलबंडीला धडक मारुन बैलबंडी वरिल नामदेव दयाराम मानापुरे रा. खरबी यास जखमी करण्यास व त्याचा मुलगा प्रमोद नामदेव मानापुरे वय २८ वर्ष, रा. खरबी याचे मरणास कारणीभुत झाल्याने व आरोपीने अपताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादी विजय नामदेव गोमासे वय ३३ वर्ष, रा. खरबी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम २७९,३३८,३०४(अ) भादंवि. सहकलम १८४,१३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. गेडाम पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) ट्रेलर चालकाने वाहन लापरवाहीने चालवुन चारचाकी गाडीला धडक दिल्याने गुन्हा नोंद. :—**

दिनांक १६/०७/२०१७ चे ११.३० वा. दर. यातील फिर्यादी जितेंन्द्र हरीभाऊ पटले वय ३६ वर्ष, रा. गुजराती कॉलोनी प्लाट नं. १२२ भंडारा फोर व्हिलर मॅक्स पिकअप क्र. एम व्ही ३६/सीयु ७७६८ या गाडी मधिल ग्रेनाईट खाली करीत असतांना यातील आरोपी वाहन चालकाने आपले ताब्यातील ट्रेलर हयगयीने, लापरवाहीने चालवुन मागेहुन सिंधी कॉलोनी झुलेलाल चौकाचे समोर भंडारा येथे धडक दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९ भांदवि. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. महालगावे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**४) मोटार सायकलची चोरी . :—**

दिनांक १५+१६/०७/२०१७ चे २२.०० वा. ते सकाळी ०७.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी सुर्यकांत गणपत हटवार वय ४९ वर्ष, रा. बोस नगर तुमसर याचे घरा समोरील खुल्या जागेत मोटार सायकल क्र. एमएच ३६ ए ५५०५ किंमती १०,०००/—रु. ची कोणीतरी अज्ञात चोराने कोणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. म्हसकर पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

५) डोक्याला मार लागल्यामुळे औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु . :—

दिनांक १५/०७/२०१७ चे ०२.०० वा. दर. यातील मृतक अरुण निरंजन बैरागी वय ४० वर्ष, रा. अरुण नगर पो.स्टे. अर्जुनी मोर. जि. गोदिंया याचे डोक्याला मार लागल्यामुळे त्यास मेडीकल कॉलेज नागपुर येथे औषधोपचारा करीता भरती केले असता उपचारा दरम्यान दिनांक १५/०७/२०१७ चे ०९.०० वा. दर. मरण पावल्याने पो. स्टे. अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र पो. शि. ३५७ यांनी पोस्टे लाखांदुर येथे आणुन पेश केल्याने पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम १७४ प्रमाणे नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. निंबेकर पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

६) अवैध दारु अडयावर धाडी . :—

दिनांक १६/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे गोबरवाही, अडयाळ व लाखांदुर येथे अवैध दारु अडयावर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ४४ लिटर हातभट्टी दारु किंमती ३,९००/—रु. तसेच ९ लिटर देशी दारु+ १ मोटार सायकल किंमती २७७०४/—रु. असा एकुण किंमती ३१,६०४/—रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक १६/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १३१ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०१ तीन सिटर वाहनांवरती १५ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ११५ केसेस करण्यात आलेल्या आहेत

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.